# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# प्रादेशिक बातमीपत्र
# सकाळी 07 वाजून 10 मि

**दिनांक:22.03.2026** **वारः रविवार**

---

1.जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणंही गरजेचं आहे" : उपराष्ट्रपतींचं प्रतिपादन

2.तरुण लोकसंख्येला कौशल्याची जोड असेल तरच तो देशाचा 'डेमोग्राफिक डिविडंड' तयार होतो : मुख्यमंत्र्यांचं मत

3.उद्यापासून व्यावसायिक ग्राहकांसाठी आणखी २० टक्के एलपीजी गॅस देण्याची केंद्राची तयारी आणि

4.68 व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत आज किताबी लढत

**उपराष्ट्रपती**

"हार्ड स्किल आणि सॉफ्ट स्कील यांची सांगड घालणाऱ्यांना भविष्यात स्थान राहील. जगाशी स्पर्धा करण्यासाठी विद्यापीठांमधे आधुनिक आणि वैज्ञानिक दृष्टीकोन असणारा अभ्यासक्रम असणंही गरजेचं आहे", असं उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. मुंबईत रतन टाटा महाराष्ट्र राज्य कौशल्य विद्यापीठाच्या पहिल्या दीक्षांत समारंभात काल उपराष्ट्रपती बोलत होते.

"आजच्या काळात विद्यार्थ्यांनी केवळ पदवी मिळवणं पुरेसं नाही, तर ती पदवी रोजगारात रूपांतरित होणं आवश्यक आहे. आजच्या काळात तांत्रिक ज्ञानासोबतच सॉफ्ट स्किल्स आणि बदलत्या तंत्रज्ञानाशी जुळवून घेण्याची क्षमता असणे ही यशाची गुरुकिल्ली मानली जाते. उद्योजक बनू इच्छिणाऱ्या तरुणांनी रतन टाटा यांचा आदर्श ठेवावा. नफा मिळवण्यासोबतच सामाजिक जबाबदारी कशी पार पाडावी, याचं टाटा हे उत्तम उदाहरण आहेत. प्रत्येक व्यक्तीची प्रगती ही समाजाची, राज्याची आणि पर्यायाने देशाची प्रगती असते, असं प्रतिपादन उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी यावेळी केलं.

राज्यपाल जिष्णू देव वर्मा, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्यासह विविध मान्यवर यावेळी उपस्थित होते.

**<u>मुख्यमंत्री</u>**

'एआय लिविंग लॅब' उपक्रमांतून विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष उद्योग क्षेत्रातील समस्या सोडवण्याचं प्रशिक्षण दिलं जात आहे ही अभिनंदनीय बाब असल्याचं यावेळी बोलतांना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं.

केवळ तरुण लोकसंख्या असून चालत नाही, तर त्या लोकसंख्येला कौशल्याची जोड असेल तरच तो देशाचा डेमोग्राफिक डिविडंड अर्थात लोकसंख्याशास्त्रीय लाभांश तयार होतो. तरुणांना दर्जेदार शिक्षण, आरोग्य सुविधा आणि आधुनिक तंत्रज्ञानाचं प्रशिक्षण देणे आवश्यक असते. 'कृत्रिम बुद्धिमत्ता' हे आव्हान पेलण्यासाठी - कुशल मनुष्यबळ तयार करणं गरजेचं आहे, असं सांगताना मुख्यमंत्री म्हणाले....

**<u>जैनदीक्षासमारंभ</u>**

जैन समाजाची सेवा, त्याग आणि अहिंसेची परंपरा समाजासाठी प्रेरणादायी – असल्याचं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी म्हटलं आहे. मुंबईत काल ६४ व्या जैन दीक्षा समारंभप्रसंगी ते बोलत होते. भगवान महावीरांनी दिलेला अहिंसा, अपरिग्रह आणि अनेकांत-वादाचा संदेश आजच्या काळात अधिक महत्त्वाचा ठरत असल्याचंही त्यांनी सांगितलं .

जैन धर्माचा संदेश शांतता, संयम आणि समन्वयाचा असल्याचं यावेळी उपस्थित राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांनी याप्रसंगी बोलताना सांगितलं.

अहिंसा ही केवळ शारीरिक हिंसेपुरती मर्यादित नसून विचारांमध्येही हिंसा नसावी, हा संदेश जैन तत्त्वज्ञान देतं . देशाच्या अर्थव्यवस्थेच्या वाढीत मोठं योगदान देतानाच दान-पुण्याच्या क्षेत्रातही जैन समाज अग्रस्थानी असल्याचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितलं .

जैन समाजाच्या प्रगतीसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तींचा या कार्यक्रमात सत्कार करण्यात आला.

**युवासंसद**

उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन कालपासून 2 दिवसांच्या महाराष्ट्र दौऱ्यावर असून काल सकाळी त्यांनी नागपूरमध्ये भारतीय युवा संसदेच्या २९व्या राष्ट्रीय अधिवेशनाला संबोधित केलं. जग सध्या युद्धाच्या छायेत असून त्यावर केवळ संवादाच्या मार्गानेच तोडगा निघू शकतो. भारतीय युवा संसद हे केवळ चर्चेचं व्यासपीठ नसून ते भविष्यात जबाबदार नागरिक घडविण्याचं  प्रभावी माध्यम आहे, असं ते यावेळी म्हणाले.

या परिषदेच्या माध्यमातून विचारांना आकार दिला जातो. चारित्र्याची जडणघडण होते. चारित्र्यनिर्मिती हाच भक्कम नेतृत्वाचा पाया आहे. जर आपलं  आयुष्य चारित्र्य संपन्न असेल, तर आपलं  नेतृत्व प्रभावी ठरेल. असं ते म्हणाले.

काल नागपुरात रेशीमबाग इथल्या महर्षी व्यास सभागृहात या परिषदेचं - उपराष्ट्रपती सी.पी.राधाकृष्णन आणि राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांच्या हस्ते उद्घाटन करण्यात आलं.

पुण्याजवळ उरळीकांचन इथल्या निसर्गोपचार आश्रमाच्या स्थापना-दिन कार्यक्रमाला उपराष्ट्रपती आज उपस्थित राहणार आहेत.

**एलपीजी**

व्यावसायिक ग्राहकांसाठी उद्यापासून आणखी २० टक्के एलपीजी गॅस देण्याची तयारी केंद्र सरकारनं दाखवली आहे. त्यामुळे  राज्यांना त्यांच्या मासिक सरासरीच्या एकूण ५० टक्के एलपीजी मिळेल. खासगी उपहारगृह, ढाबे, हॉटेल, कंपन्यांमधली उपहार गृह, राज्य सरकार किंवा स्थानिक स्वराज्य संस्थांद्वारे चालवली जाणारी भोजनगृह, अन्न प्रक्रीया आणि डेअरी उद्योगाला - हा व्यावसायिक एलपीजी देताना प्राधान्य दिलं जाणार आहे. याशिवाय ५ किलोचे सिलिंडर घेणाऱ्यांनाही प्राधान्य द्यायचे निर्देश - केंद्रीय पेट्रोलियम सचिवांनी  सर्व राज्यांच्या मुख्य सचिवांना लिहिलेल्या पत्रात - दिले आहेत. एलपीजी पुरवठ्याचा लाभ घेण्यासाठी पेट्रोलियम कंपन्यांकडे नोंदणी करावी लागेल; तसंच पाइप गॅसची जोडणी घेण्यासाठी संबंधित कंपनीकडे अर्ज देऊन आवश्यक प्रक्रीया पूर्ण केल्यावरच, हा अतिरीक्त पुरवठ्यातला एलपीजी मिळणार आहे.

**<u>आयआयटी</u>**

‘भारत इनोव्हेटिव डीप-टेक प्री-समिट’चं काल आयआयटी मुंबईतल्या रिसर्च पार्क फाऊंडेशन इथे उद्घाटन झालं. केंद्र सरकारचे मुख्य वैज्ञानिक सल्लागार प्राध्यापक अजय कुमार सूद, उच्च शिक्षण विभागाचे सचिव डॉक्टर विनीत जोशी, विज्ञान आणि तंत्रज्ञान विभागाचे सचिव अभय करंदीकर यावेळी उपस्थित होते. या दोन दिवसीय परिषदेत स्टार्टअप्स, गुंतवणूकदार, उद्योग जगतातील उच्चपदस्थ अधिकारी, धोरणकर्ते सहभागी झाले होते. ही परिषद येत्या वर्ष अखेरी फ्रान्समधे होणाऱ्या भारत इनोव्हेटीव २०२६ करिता महत्त्वाची ठरणार आहे.

**<u>कॅन्सरव्हॅन</u>**

पालघर जिल्ह्यात भाताणे इथल्या आयुष्मान आरोग्य मंदिराच्या अंतर्गत उपकेंद्र खानिवडे इथे कर्करोग तपासणी शिबिराचं आयोजन करण्यात आलं होतं. या शिबिरात कॅन्सर व्हॅनच्या माध्यमातून 63 रुग्णांची तपासणी करण्यात आली. दंतरोगतज्ज्ञ डॉ. सागर नागरे तसचं वैद्यकीय अधिकारी डॉ. सुषमा मुळीक यांनी रुग्णांची तपासणी केली.

महिलांच्या आरोग्याच्या दृष्टीने विशेष उपक्रम म्हणून 17 महिलांची V I A पद्धतीने तपासणी करण्यात आली. या तपासणीत 4 संशयित रुग्ण आढळून आले असून पुढील वैद्यकीय तपासणी आणि उपचारासाठी त्यांचा पाठपुरावा केला जाणार आहे.

**<u>संविधानभवन</u>**

राज्यघटनेला ७५ वर्षं होत असल्याच्या पार्श्वभूमीवर रत्नागिरी जिल्ह्यातल्या पाचही विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रत्येकी एक संविधान भवन उभारलं जाणार आहे. पालकमंत्री उदय सामंत यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत काल हा निर्णय घेण्यात आला. या 5 भवनांमध्ये स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्र सुरू करण्यात येईल, असंही पालकमंत्र्यांनी सांगितलं.

**<u>ड्रोन</u>**

गडचिरोली जिल्ह्यातील शेतीला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाने ‘कृषी ड्रोन’च्या माध्यमातून खते आणि कीटकनाशकांच्या फवारणीचा पथदर्शी उपक्रम सुरू केला आहे. या उपक्रमांतर्गत

जिल्ह्यातील शेतकरी आणि महिला बचत गटांना ड्रोन खरेदीसाठी अनुदान आणि तांत्रिक सहकार्य केलं जाणार असून स्थानिक युवक आणि महिलांना ड्रोन पायलट म्हणून प्रशिक्षण देऊन रोजगार निर्मिती केली जाणार आहे.

**कुस्ती**

पुण्यात वाघोलीमध्ये सुरू असलेल्या 68 व्या महाराष्ट्र केसरी स्पर्धेत किताब गटातील गादी आणि माती विभागाच्या उपांत्यपूर्व तसंच उपांत्य फेरीच्या लढतींनी कालच्या दिवसाची सांगता झाली .

गादी विभागातून सोलापूरचा जय पाटील आणि नाशिकचा हर्षवर्धन सदगीर, तर माती विभागातून सोलापूरचा महेंद्र गायकवाड आणि हिंगोलीचा सिकंदर शेख यांनी अंतिम फेरीत प्रवेश निश्चित केला. स्पर्धेचा आज अंतिम दिवस असून महाराष्ट्र केसरी या किताबाची मुख्य लढत होणार आहे. महाराष्ट्र केसरी किताब पटकवणाऱ्या पैलवानाला मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत चांदीची गदा देण्यात येणार आहे.

हवामान-

दक्षिण मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यातील जिल्ह्यांमध्ये तुरळक ठिकाणी आज हलक्या पावसाची शक्यता आहे. कोकण आणि उत्तर मध्य महाराष्ट्र तसंच विदर्भात प्रामुख्यानं कोरडं हवामान राहील असा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे.

## आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं, नमस्कार.